# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
ई-मेल- jtdirrom@gmail.com website – www.jdteromumbai.com


परिपत्रक

क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१८/ 952

दिनांक : 16 MAR 2018

प्रति,
सर्व शासकीय, अशासकीय विनाअनुदानीत,
खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
एमबीए, एमसीए, वास्तुशास्त्र, अभियांत्रिकी पदवी/पदविका,
औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालये.

विषय : ईबीसी २०१७-१८ चे विद्यार्थ्यांनी वाढीव मुदतीत भरलेले ऑनलाईन फॉर्म्स सादर करण्याबाबत
खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत शिक्षण संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के प्रतिपूर्ती तसेच वसतीगृह निर्वाहभत्ता योजनेबाबत

१. **“राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना”**
२. **“डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना शैक्षणिक”**

(विद्यार्थ्यांनी संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन भरलेले अर्ज सादर करण्याबाबतची कार्यवाही)

संदर्भ : या कार्यालयाची परिपाकत्रके क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१८/६९८, दि. २८/०२/२०१८,
क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१८/७२४, दि. ०५/०३/२०१८

संदर्भीय विषयान्वये सर्व शासकीय (शासकीय अभिमत विद्यापीठांसह), अशासकीय अनुदानीत व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित (खाजगी अभिमत/स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे वगळून) एमबीए, एमसीए, वास्तुशास्त्र, अभियांत्रिकी पदवी/पदविका, औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालयांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रवेशित आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या ५० टक्के शिष्यवृत्तीबाबतचे ऑनलाईन अर्ज छाननीची प्रक्रिया चारही केंद्रांवर दि. ०६/०३/२०१८ ते दि. १५/०३/२०१८ पर्यंत पूर्ण करण्यांत आलेली आहे. एक विशेष बाब म्हणून शासनाने विद्यार्थ्यांकरिता ही मुदत दि. ०६/०३/२०१८ ते दि. १५/०३/२०१८ पर्यंत वाढवून दिलेली होती. दरम्यानच्या कालावधीत ज्या संस्थांनी त्यांचे अर्ज संबंधीत छाननी केंद्रांवर छाननी करुन घेतलेले आहेत व आता अशा संस्थांकडे वरील वाढीव मुदतीत ज्या विद्यार्थ्यांनी त्यांचे अर्ज भरुन सादर केले असतील अशा सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज विहीत कागदपत्रांसह स्विकारायचे आहेत. संस्थांनी कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांचे अर्ज नाकारायचे नाहीत. असे अर्ज व्यवस्थित छाननी करुनच कोणतीही त्रुटी न ठेवता ह्या कार्यालयाकडे दि. २०/०३/२०१८ ते दि. २३/०३/२०१८ ह्या कालावधीत स्वतंत्र फाईलमध्ये सादर करायचे आहेत. अर्ज सादर करतांना आपल्याकडे अगोदरचे व आता आलेले अर्ज असे एकत्रित विवरणपत्र प्रिंट होणार आहे. संस्थांनी एकत्रित विवरणपत्रामध्ये आता जे अर्ज प्राप्त झाले आहेत ते हायलाईट करुन एकत्रित यादी सादर करायची आहे.

....२.

सर्व संस्थांना पुन्हा एकदा सूचित करण्यांत येते की, आपण या आधी जरी आपले अर्ज सादर करुन छाननी करुन घेतली असली तरी आता वाढीव मुदतीत जे विद्यार्थी अर्ज भरुन आपल्याकडे सादर करतील त्यांचे अर्ज विहीत कागदपत्रांसह स्विकारायचे आहेत व वरील कालावधीत विनात्रुटी ह्या कार्यालयाकडे छाननीसाठी सादर करायचे आहेत.

**अत्यंत महत्त्वाची सूचना** : असे निदर्शनास येते आहे की, काही संस्था वेळ वाचवण्याकरिता वाढीव मुदतीत ज्या विद्यार्थ्यांने अर्ज भरला असेल त्या विद्यार्थ्याला स्वतःला किंवा त्यांच्या पालकांना असे अर्ज सादर करण्यांसाठी पाठविण्याची शक्यता आहे. तरी सर्व संस्थांना सूचित करण्यांत येते की, त्यांनी असे अर्ज ईबीसीचे काम हाताळणा-या कर्मचा-यांतर्फेच पाठवावयाचे आहेत. कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थी किंवा त्यांच्या पालकांकडून असे अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई
यांचेकरिता